




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784








वर्ष ३ रे | अंक : १५१ वा मंगळवार दि. २२ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही आरोग्य विभागाची टोलवाटोलवी

## भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यापासून आरोग्य विभाग पळ का काढतंय?













**वादग्रस्त बहुचर्चित बडतर्फ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला यांनी केलेल्या करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात झालेल्या विभागीय चौकशीत दोष सिद्ध होऊन बोथे यांची चल अचल संपत्ती जप्त करून ती लिलाव करा व आलेले सर्व रुपये शासन तिजोरीत जमा करण्याचे आदेश पत्र देऊनही अद्याप पर्यंत कुठलीच कारवाई झालेली नाही**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बसून अजीर्ण होईस्तोवर भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यापासून पळ काढणाऱ्या आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशीच्या बाबतीत चक्क लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही ठेंगा दाखवला आहे. आरोग्य विभागातील अधिकारी एव्हढे कसे निर्लज्ज आणि निर्ढावलेले होऊ शकतात, हे यावरून दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांमध्ये जो काही कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, त्या भ्रष्टाचारातील दोषींना वाचवण्याचा आजही आटोकाट प्रयत्न आरोग्य विभाग करीत असल्याचे नव्या पत्राने सिद्ध झाले आहे. बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात कोरोनाची महाभयंकर साथ आणि त्याआधीपासूनही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आलेला आहे. कोरोनाच्या काळात या भ्रष्टाचाराला चांगलाच मोहोर फुटला होता. कोरोनाची अत्यंत आणीबाणीची स्थिती पाहता जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रचंड प्रमाणात औषधे व उपकरणांची खऱेदी करण्यात आली. या खरेदीत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. केवळ कागदोपत्री खरेदी दाखवून खोटी बिले काढण्यात आली. या कामात गेल्या अनेक वर्षांत या ठिकाणी आलेले जिल्हा शल्यचिकित्सक, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक तसेच बहुचर्चित बडतर्फ भांडारपाल प्रकाश बोथे हे दोषी आहेत. जिल्हा शल्यचिकित्सकांमध्ये खास करून डॉ.नितीन तडस हे जास्त दोषी आहेत, कारण त्यांच्याच कार्यकाळात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार या ठिकाणी झालेला आहे. या भ्रष्टाचारासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी सातत्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी केली होती. परंतु आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सातत्याने भ्रष्टाचारावर पांघरुण घालून दोषींना वाचवण्याचे काम केलेले आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला, त्यानंतर या प्रकरणाला मोठी वाचा फुटली व अधिकाऱ्यांवर दबाव आला. या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी आजवर वेगवेगळ्या समित्या नेमण्यात आल्या,ज्यामध्ये डॉ. नितीन तडस व प्रकाश बोथे सह इतर हे दोषी आढळून आलेले आहेत. प्रकाश बोथे यांची तर संपत्ती जप्त करावी, असा शेरादेखील एका चौकशी समितीने अहवालात मांडलेला आहे. या चौकशी समितीत विद्यमान डॉ.भंडारी हे होते. आता डॉ.भंडारी हे स्वतःच आरोग्य उपसंचालक झालेले आहेत, परंतु कारवाईचे पत्र काढण्यात डॉ.भंडारी हे चालढकल करीत आहेत. कारवाईचे पत्र काढण्यास डॉ. भंडारी यांना नेमके कोणी रोखले की काही आर्थिक देवाण-घेवाण झाली, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. खरे तर डॉ. भंडारी यांनी तात्काळ कारवाईचे आदेश देऊन या प्रकरणी आपली कार्यतत्परता सिद्ध करणे गरजेचे आहे. मात्र, असली कार्यतत्परता डॉ. भंडारी यांच्यात नाही हेच अद्याप दिसून आलेले आहे.या संपूर्ण भ्रष्टाचाराची राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडेही तक्रार करण्यात आली होती. त्या वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यासंदर्भात चौकशी करून कारवाई करण्यासंदर्भात पत्र आरोग्य विभागाल दिले होते. परंतु आरोग्य विभागाने नालायकपणाचा कळस गाठत चक्क लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पत्राला देखील केराची टोपली दाखवली. यावरून स्पष्ट आहे की, आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी हे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवून आपली भ्रष्टाचारी प्रवृत्ती सिद्ध करीत आहेत. परत एकदा काही दिवसांपूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेही आरोग्य विभागाला पत्र पाठवून जागवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सद्यःस्थितीत राज्याच्या आरोग्य विभागाने चक्क झोपेचे सोंग घेतल्याचे दिसून येत आहे. कारण एव्हढा दबाव येऊनदेखील आणि एव्हढी मागणी करून देखील आरोग्य विभाग भ्रष्टाचारावर कारवाई करीत नसेल, तर राज्याच्या संपूर्ण आरोग्य विभागाला भ्रष्टाचाराचे व्हायरल इन्फ क्शनने ग्रासले आहे, असे खेदाने म्हणावे लागते आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही ठेंगा दाखवण्याचे काम आरोग्य विभाग करीत आहे. भ्रष्टाचारमुक्त शासन देण्याचा दावा करणाऱ्या फडणवीस सरकारने आपल्याच अखत्यारीतील आरोग्य विभागात चाललेल्या या भ्रष्टाचाराकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा भ्रष्टाचारामुळे अख्खा आरोग्य विभाग पोखरून कोलमडल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत आरोग्य विभागातील या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचारावर आसूड ओढण्याचे काम करीतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

# ३० लाखांचे १७७ मोबाईल मूळ मालकांना केले परत! बुलढाणा पोलिसांची मोठी कामगिरी

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीतून गहाळ झालेले अंदाजे ३० लाख किमतीचे एकूण १७७ मोबाईल बुलढाणा पोलिसांनी शोधून काढले. अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोफळे यांच्याहस्ते मूळ मालकांना त्यांचे मोबाईल २१ जुलै रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात वितरित करण्यात आले.

विशेष म्हणजे, ही धडाकेबाज कामगिरी बुलढाणा पोलीस व तांत्रिक विश्लेषण विभागाच्या पथकाने केवळ दोन महिन्यात पूर्ण केली. जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीतून विविध कंपनीचे तब्बल १७७ मोबाईल गहाळ झाल्याचे पोलीस दलाच्या संकेतस्थळावर नोंदविण्यात आले होते. त्या अनुषंगाने, काही तक्रारी देखील प्राप्त झाल्या होत्या. यासाठी, विशेष शोध मोहीम राबवून गुन्हे शाखा व तांत्रिक विश्लेषण विभागाने ङ्गपोर्टलद्वारेफ प्रकरणांचा उलगडा करीत गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध लावला. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव श्रेणिक लोढा, अप्पर पोलीस अधीक्षक बुलडाणा अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्यासह जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनातील प्रभारी अधिकाऱ्यांनी पार पाडली. याप्रसंगी, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या




विविध कल्याणकारी योजनांच्या माहितीसाठी एका पुस्तिकेचे अनावरण पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोफळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, पोलीस अधिकारी व कर्मचारी आपल्या कुटुंबा समवेत हजर होते.

# कृषी क्षेत्रापुढील आव्हाने

## संपादकीय लेख

धान्याचे उत्पादन २०२४-२५ या कृषी वर्षात ३५३.९५ दशलक्ष टन एवढे झाले होते. हे उत्पादन भारतातील १४५ कोटी लोकांची धान्याची गरज पूर्ण करू शकणारे नव्हते. साधारणपणे भारताएवढी लोकसंख्या असणाऱ्या चीनमध्ये धान्याचे उत्पादन सुमारे ५५० दशलक्ष टन एवढे होते. चीन भारताप्रमाणे धान्याची निर्यात करीत नाही. तसेच धान्याचा वापर करून इथेनॉल तयार करीत नाही. चीनमध्ये भाज्या व फळे यांचे उत्पादन जागतिक पातळीवर सर्वात जास्त होते. शेती उत्पादनात विक्रम करणाऱ्या चीनमध्ये उपजाऊ जमीन भारतापेक्षा कमी आहे आणि शेताचे सरासरी आकारमान १.५ एकर आहे. तसेच ही शेतजमीन शेतकऱ्यांच्या मालकीची नाही. चीनमधील सर्व जमीन सरकारच्या मालकीची आहे. शेतकऱ्यांना ती कसण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कराराने देण्यात आलेली आहे. सरासरी दीड एकराचे क्षेत्रफळ असणारे चीनमधील शेतकरी जगामध्ये सर्वात जास्त धान्य, भाज्या आणि फळे यांचे उत्पादन करतात. हा सर्व प्रकार विस्मयकारक आहे. तसेच चीनमधील शेती क्षेत्राची उत्पादकता भारतामधील शेती क्षेत्राच्या उत्पादकतेपेक्षा लक्षणीय प्रमाणात जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न जास्त आणि शेती उत्पादनांच्या किमती कमी अशी स्थिती आहे. ही स्थिती चीनमधील ग्राहकांना सुखावणारी आहे. चीनमधील राज्यकर्त्यांनी १९७८ नंतर कृषीविषयक संशोधनासाठी भरपूर खर्च केला. कृषी संशोधन त आघाडी प्रस्थापित करण्यासाठी ङ्गसिंजेंटाफ ही जागतिक पातळीवरील कृषी संशोधन करणारी एक नामवंत कंपनी चीनने ४३ अब्ज डॉलर खर्च करून विकत घेतली. सदर व्यवहारामुळे चीन हा देश कृषी संशोधनाच्या संदर्भात जगात पहिल्या क्रमांकावर पोहोचला. चीनने १९७८ नंतर शेती विकासाचे केलेले काम नेत्रोद्दीपक आहे आणि भारताचे या संदर्भातील काम अभ्यासकांचे डोळे बंद करणारे आहे. भारतातल्या राज्यकर्त्यांनी आणि कृषी वैज्ञानिकांनी यापासून धडा घ्यायला हवा. शेतीविषयक संशोधनाचा विचार केल्यास भारतातील कृषी वैज्ञानिक संशोधनाचे काम करण्यासाठी सक्षम नाहीत, असे दिसते. भारतातील कृषी विद्यापीठांमध्ये सुमार दर्जाचे शिक्षण दिले जाते. जागतिक पातळीवर अमेरिका व चीन या दोन देशांमधील कृषी विद्यापीठांत उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे सदर देशांत मूलभूत संशोधनाचे काम होते. अमेरिकी कृषी वैज्ञानिक डॉक्टर नॉर्मन बोरलॉग यांनी गव्हाचे अधिक उत्पादक बियाणे विकसित करून जगातील भुकेची समस्या संपविण्यासाठी काम केले. त्यासाठी त्यांना १९७० साली नोबेल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. कृषी वैज्ञानिकाला नोबेल पुरस्कार आजपर्यंत केवळ एकदाच मिळाला आहे. डॉक्टर नॉर्मन बोरलॉग यांनी चीनमधील एक अग्रगण्य कृषी वैज्ञानिक युआन लाँगपिंग यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या मूलभूत संशोधनाचे काम खूप उच्च दर्जाचे असल्याचे मान्य केले होते. परंतु, त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला नाही. डॉक्टर युआन लाँगपिंग यांच्या अंत्ययात्रेत हजारो लोक सामील झाले होते, हाच त्यांच्यासाठी मोठा पुरस्कार होता. भारतातील महान कृषी वैज्ञानिक डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन यांनी ते कृषी आयोगाचे अध्यक्ष असताना २००६ मध्ये सरकारने कृषी उत्पादनांचे किमान आधारभाव एकूण



उत्पादनखर्चाच्या दीडपट करावेत, अशी अनाहूत शिफारस केंद्र सरकारला केली होती. सदर आयोगाने क्रियाकलापाची मर्यादा ओलांडून संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला आपला अहवाल सादर केला. तेव्हा पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग होते. डॉक्टर मनमोहनसिंग हे केंब्रिज विद्यापीठातील सुवर्णपदक मिळविणारे हुशार विद्यार्थी. डॉ. स्वामीनाथन आयोगाचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की कृषी उत्पादनांच्या किमान आधारभावात पन्नास टक्क्यांची वाढ केल्यावर महागाई वाढणार आहे. त्यासाठी त्यांना स्वामीनाथन आयोगाचा अहवाल उपयुक्त ठरला. महागाईची आग भडकली. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना वर्षाला दहा टक्के दराने महागाई वाढत होती. त्या वेळी विकसित देशांत महागाई वाढण्याचा दर दोन टक्के होता.

# अवैध गौवंश वाहतुक बंद करून गोवंश हत्या बंदी कायदयाची कडक अंमलबजावणी करा!

## पशुसंवर्धन विभागाने टॅगिंग केलेल्याच पशूंची खरेदी विक्री करा!-विश्व हिंदु परिषद बजरंग दलाचे निवेदन!

**जनसंचलन/ चिखली**

महाराष्ट्र राज्यामध्ये संपूर्ण गौवंश हत्या बंदी कायदा लागू असला तरी चोरट्या मार्गाने गोवंशाची कत्तल सुरूच असल्याने २१ जुलै रोजी विहिप-बजरंग दलाचे वतीने चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदन देण्यात आले. अवैध गौवंश वाहतुक बंद करून गोवंश हत्या बंदी कायदयाची कडक अंमलबजावणी करा,अशी मागणी करण्यात आली. सदर निवेदना मध्ये असे म्हटले आहे की, आपल्या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात गौवंशाची तस्करी होत असून अवैधरित्या विनापरवाना वाहनाने गौवंशाची वाहतुक केल्या जात आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये २०१५ सालापासून संपुर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू झालेला असून सुध्दा मोठया प्रमाणात गौवंशाची कत्तल होवून गावोगावी दुचाकी वाहनांवर छोटे छोटे पॅकेट बनवून त्याची विक्री केल्या जात असल्याची माहिती येत आहे. या संपुर्ण प्रकारामुळे सनातनी हिंदू समाजाच्या आस्थेला ठेच पोहचत असून त्यांच्या भावना दुखावल्या जात आहेत. अलीकडच्या काळामध्ये गौवंशाची अवैध वाहतुक व कत्तल करण-यांवर प्रशासनाची कारवाई होतांना दिसताच गोतस्करी करणारे व गुरांचे अवैध व्यापारी हे विश्व हिंदू परिषद व बजरंग दलावर माऱझोडीचा खोटा आरोप करून अपप्रचार करत आहेत. विश्व हिंदू परिषद- बजरंग दल हे राष्ट्रव्यापी संघटन असुन कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी कटीबध्द आहे.तरी सुध्दा असे खोटे आरोप होत असतील तर ते खपवून घेतल्या जाणार नाही. वास्तविक पाहता गुरांच्या बाजारपेठेत होणारा व्यापार व त्यांची वाहतूक ही कायदया नुसार होत नाही. गोवंशाची खरेदी व विक्री करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीची संगणकीकृत पावती तसेच सचिवाचा सही व शिक्का असावा लागतो तसेच गुरांची वाहतुक करतांना प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर टि ओ ) यांनी परवानगी दिलेल्या वाहनांमध्येच प्रमाणीत केलेल्या पशुंच्या संख्येची वाहतुक करणे क्रमप्राप्त आहे.व ते सुध्दा पशुसंवर्धन विभागाने टॅगींग केलेलेच पशु असावे. परंतु सदर गोवंश व अन्य गुरांचा व्यापार व वाहतुक करतांना उपरोक्त दर्शवलेल्या कुठल्याच नियमांचे पालन होत नाही व सर्रासपणे कायदयाचे उल्लंघन केले जाते. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, कायदा मोडून बाजारात होणारा गुरांचा व्यापार व वाहतुक तसेच गोवंशाची तस्करी व हत्या करून मांस विक्री करण्यावर कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा विश्व हिंदू परीषद, बजरंग दल रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करेल. यावेळी चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती यांना सुद्धा निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये गुरांची खरेदी विक्री करताना सचिवांची सही व शिक्का असलेल्या संगणकृत पावती वरच नियमाने व्यवहार




व्हावा.पशुसंवर्धन विभागाने टॅगिंग केलेल्याच पशूंची खरेदी-विक्री करावी. आणि हे नियम मोडणाऱ्यावर कडक कार्यवाही व्हावी अशी मागणी करण्यात आली. डॉ. मयूर करे -बजरंग दल जिल्हा संयोजक, गणेश थोरवे जिल्हा गोसेवा व गोरक्षा प्रमुख, अर्जुन गाडेकर प्रखंड मंत्री ( वि. हि. प.), सोहम तेजनकर प्रखंड सह-मंत्री (वि. हि. प), सुमित जवंजाळ - बजरंग दल संयोजक, देवराज सवडतकर , बजरंग दल सह-संयोजक, निखिल चव्हाण गोसेवा व गोरक्षा प्रमुख, आयुष दांडगे - विद्यार्थी सह-प्रमुख बजरंग दल, सौरभ बनपुरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# साताऱ्यात २० लाखांची चोरी, केरळात जात पोलिसांनी आवळल्या मुसक्या, एक टीप ठरली महत्त्वाची, सिनेमाहून भारी थरार...

**सातारा :** पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कार अडवून सोने-चांदी व्यावसायिकाचे २० लाख रूपये लुटून केरळला पलायन केलेल्या १२ जणांच्या टोळीतील ७ जणांना जेरबंद करण्यात सातारा पोलिसांना यश आले. संशयितांकडून लुटीची रक्कम आणि वाहने मिळून ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील पाच जण अद्याप फरार आहेत. सातारा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) केरळमध्ये जाऊन तेथील पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या रॉबरी गँगवर संपूर्ण देशभरात गुन्हे दाखल असून दोन राज्यात ते वाँटेड आहेत. या टोळीचा पर्दाफाश केल्याबद्दल सातारा पोलिसांचे कौतुक होत आहे.साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी कारवाईची माहिती देताना सांगितले की, सोने-चांदी व्यावसायिक विशाल पोपट हासबे (रा. हिवरे, ता. खानापूर, जि. सांगली) हे १२ जुलै रोजी ह्युंदाई कारने (एम. एच. ०९ ई. आर. ९४६८) पुण्याकडे निघाले होते.



पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर भुईंज (ता. वाई) गावच्या हद्दीत मध्यरात्री अज्ञातांनी त्यांच्या कारला स्कार्पिओ, इनोव्हा आणि स्विफ्ट कार आडवी मारली. लोखंडी रॉडने गाडीच्या काचा फोडून फिर्यादीला मारहाण केली. चाकूचा धाक दाखवत कारमधील २० लाखांची रोकड चोरली. तसेच कारसह फिर्यादीचे अपहरण केले. नंतर त्यांना सर्जापूर फाटा (ता. जावळी, जि. सातारा) हद्दीत सोडून पलायन केले.लूटमारीच्या घटनेनंतर पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरूण देवकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित फार्णे, भुईंजचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, उपनिरीक्षक पतंग पाटील यांच्या पथकांना तपासाच्या सूचना केल्या. त्यानंतर सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये नाकाबंदी करण्यात आली. संशयितांनी गुन्ह्यात वापरलेले वाहन विटा, तासगावकडे (जि. सांगली) गेल्याचे समजताच सांगली पोलिसांना अलर्ट केले. सांगली पोलीस आणि स्थानिक नागरीकांच्या मदतीने योगेवाडी (ता. तासगाव) हद्दीत वाहन अडवून विनीथ उर्फ राजन राधाकृष्ण याला ताब्यात घेण्यात आले पोलीस मागावर असल्याचे समजल्याने त्याने लुटीचे २० लाख रूपये एका ठिकाणी लपवून ठेवले होते. ते पोलिसांनी जप्त केले. तसेच तांत्रिक विश्लेषणावरून अन्य संशयित आरोपी आणि वाहनांचीही माहिती मिळविली.महामार्गावर लूटमार करून अन्य संशयितांनी केरळ गाठल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यासाठी पोलीस पथके केरळला पाठविण्यात आली. तेथील पोलिसांच्या मदतीने नंदकुमार नारायणस्वामी (रा. चिराक्कड, जि. पलक्कड), अजिथ कुमार (रा. कनिकुलम, जि. पलक्कड), सुरेश केसावन (रा. पलनाम, जि. पलक्कड), विष्णू क्रिशनकुट्टी (रा. कारेक्कटूपरांम्बु, जि. पलक्कड), जिनु राघवन (रा. कांजिरकडवु, जि. पलक्कड) आणि कलाधरन श्रीधरन (रा. विनीकुलांबू, जि. पलक्कड) या सहा संशयितांसह गुन्ह्यात वापरलेली वाहने सातारा पोलिसांनी ताब्यात घेतली. विनीथ उर्फ राजन राधाकृष्ण (रा. ओलिओपारा, जि. पलक्कड) यास घटनेनंतर काही तासातच ताब्यात घेतले होते. एकूण १२ जणांच्या टोळीने लूटमार केली असून अद्याप १ जण फरारी आहेत.दरोडेखोरांच्या या टोळीवर संपूर्ण देशभरात लूटमारीचे गुन्हे दाखल आहेत. त्याचबरोबर तामिळनाडू आणि केरळमध्ये ही टोळी वाँटेड आहे. या टोळीची गुन्हा करण्याची मोडस ऑपरेंडी चकीत करणारी आहे. हवालामार्गे व्यवहार चालणारी कुरिअरची वाहने, सराफ व्यावसायिकांच्या गाड्या अडवून लूटमार करते. त्यामुळे अनेक घटनांमध्ये गुन्हेच नोंद झालेले नाहीत. या टोळीने वर्षाच्या सुरुवातीला जानेवारीमध्ये याच गुन्ह्यातील फिर्यादीची गाडी कर्नाटकात अडवून लूटमार केली होती. त्याची कबुलीही संशयितांनी सातारा पोलिसांना दिली आहे. या खतरनाक टोळीला जेरबंद केल्याने सातारा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# परवाची गटारी आजच करतात की काय?

## अजित दादांच्या शिलेदाराचा शिंदेसेनेत प्रवेश, सोहळ्यादरम्यान गोगावलेंचा खोचक टोला

**खोपोली:** माजी उपनगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) सोडून शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते ही शिवसेनेत आले. यामुळे विरोधकांना मोठा धक्का बसला आहे, असे बोलले जात आहे. फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी विरोधकांना खोचक टोला लगावला. ते म्हणाले, ङ्कङ्ककुलदीप शेंडे यांच्या पक्ष प्रवेशामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना आज झोप येणार नाहीङ्कङ्क.परवाची गटारी ते आजच करतील की काय असा मिश्किल टोलाही त्यांनी लगावला.खोपोलीत शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली हा मेळावा पार पडला. या मेळाव्यात कुलदीप शेंडे यांनी अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश केला. शेंडे यांच्यासोबत



अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. असंख्य कार्यकर्त्यांसह पक्ष प्रवेश केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसला खोपोलीत मोठा झटका मिळाल्याचे बोलले जात आहे. तसेच, येऊ घातलेल्या खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीतशिवसेनेची ताकदवाढल्याचेही अनेकजण बोलत आहेत.कुलदीप शेंडे हे शांत आणि संयमी नेते म्हणून ओळखले जातात. कार्यकर्त्यांमध्ये त्यांची चांगली पकड आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत शिवसेनेला याचा फायदा होईल, असे बोलले जात आहे. यावेळी खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, ङ्कङ्कआमदार महेंद्र थोरवे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून कर्जत मतदारसंघात विकासगंगा आणली आहे. जनतेला विकास दिसत आहे, म्हणूनच त्यांनी थोरवे यांना पुन्हा निवडून दिले.ङ्कङ्क त्यांनी विकासकामांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही ते म्हणाले.या मेळाव्यात नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, संपर्कप्रमुख विजय पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारण पुन्हा समीकरणं बदलत असल्याचे पहायला मिळत आहे. वेगवेगळ्या पक्षाचे नेते, कार्यकर्ते आपआपल्या सोईप्रमाणे पुन्हा एकदा पक्षांतर करताना दिसून येत आहेत.

---

# जुलैचा पाऊसफपुन्हा भेटीला, कोकणात ऑरेंज अलर्ट

**मुंबई :** जुलै महिन्यातील पहिले २० दिवस फारसा पाऊस न झालेल्या मुंबईने रविवारी रात्रीपासून मात्र जोरदार पाऊस अनुभवला आणि अखेर जुलैचा पाऊस भेटीला आल्याची भावना मुंबईकरांनी व्यक्त केली. रविवारी आणि सोमवारी दोन्ही दिवस मुंबईच्या उपनगरांमध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते. सोमवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार, दक्षिण कोकणामध्ये पुढील चारही दिवस ङ्कऑरेंज ॲलर्टफ देण्यात आला आहे. मुंबईमध्येही बुधवार, गुरुवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईमध्ये सांताक्रूझ केंद्रावर रविवारी स. ८.३० ते सोमवारी स. ८.३० या २४ तासांत ११४.६ मिमी पावसाची नोंद झाली. त्याचवेळी कुलाबा येथे केवळ ११.२ मिमी पाऊस नोंदला गेला. कोकणामध्ये तुरळक ठिकाणी पावसाचा जोर वाढलेला होता. अलिबाग येथे ९० मिमी, मुरुड ७७ मिमी, श्रीवर्धन ६५ मिमी पावसाची नोंद झाली. दक्षिण कोकणात पावसाचा जोर येत्या चार ते पाच दिवसांमध्ये वाढण्याचा अंदाज आहे. मुंबईमध्ये सोमवारी स. ८.३० ते सायं. ५.३० या वेळेत सांताक्रूझ येथे ८७ मिमी, तर कुलाबा येथे केवळ आठ मिमी पावसाची नोंद झाली. विलेपार्ले, सांताक्रूझ येथे ९० मिमीहून अधिक पाऊस दिवसभरात नोंदला गेला.मान्सूनचे वारे पुन्हा सक्रिय झाले असून, आता वातावरणीय स्थितीही पावसासाठी अनुकूल असल्याची माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली. आर्द्रता वाढली असून वाऱ्यांचा वेगही वाढण्याची शक्यता आहे.




आज दुपारपर्यंत दिवस नेहमीसारखाच चालला होता. थोडा बदल इतकाच होता की, शेजारच्या काकांना पुण्याच्या हॉस्पिटलमधून आज घरी आणणार होते. त्यामुळे त्यांचं घर उघडून थोडी मदत करून आले. दुपारी त्यांच्या मुलाचा फोन आला. निम्मा प्रवास ॲम्ब्युलन्सने झाला होता. तो आणि त्याच्या आई-बाबांबरोबर बसले होते. त्याने फोनवर सांगितले, बाबा व्यवस्थित आहेत, आता आमच्याबरोबर चहा घेतला त्यांनी. दोन अडीच तासांत आम्ही पोहोचू. मीही, येथील काही काळजी नको, घर उघडून स्वच्छ करून घेतले आहे. या तुम्ही निवांत असं बोलले. तासाभरात पुन्हा त्याचा फोन आला, मला वाटलं, काही आठवलं असेल तयारीपैकी. फोन उचलला तर तो सांगत होता, बाबा गेले..

जीवनाचा प्रवास किती अशाश्वत असतो, याचा नमुना म्हणजे हा प्रसंग. घरी येणा-या पेशंटची तयारी करताना ती एका बॉडीसाठी काही मिनिटात होऊन जाते. याला काय म्हणायचं? जो जीव काही मिनिटांच्या हिशोबात आयुष्यभर आपला म्हणून संसार जोडत उभारत आला, त्या संसारात येण्यासाठी निघाला होता, चार भिंतीतल्या माझं, माझं विश्व तयार केलेल्या त्याला क्षणात पोरकेपण आलं. काका किती वाजता येणार? या प्रश्नाचं स्वरूप तत्काळ बदलून, बॉडी किती वाजता येईल? असं झालं.

सगळे सोपस्कार झाले. विधिवत अंत्यसंस्कार, नातलगांच्या गाठीभेटी सर्व चालू होतं. आता तो काकांचा नियतीने ठरवलेला निर्णायक क्षणही थोडा बोथट झाला होता. पहिले तीन दिवस होऊन नातेवाईक पांगले. आता घरातल्या आणि जबाबदारी घेणा-या मुलाची कसोटी होती. काकूंचीही होती, पण त्यांचा अचानक आलेल्या संकटाचा भर भावनिक होता. मुलाला ओमकारला मात्र भावनिक, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक सर्वच आघाड्यांवर आता लक्ष देणे अपरिहार्य होते. त्याला नोकरी होती, पण वडिलांच्या छायेत असल्याने प्रापंचिक जबाबदारी त्याची नव्हती, पण आता ती जबाबदारी त्याला पाहायची होती. अर्थातच आम्ही शेजारचे सर्व त्याच्याबरोबर होतो.


नातेवाइकांची पांगापांग झाली आणि माझ्याच सोबत त्या माता-पुत्राने व्यवहाराचे कागद पाहण्याचे ठरवले. काकांचा स्वभाव म्हणजे या जगात कोणावर शंभर टक्के विश्वास ठेवता येतो असे कोणीही नाही. असे स्पष्ट मत परखडपणे मांडणारा होता. ते मला रोजच्या बोली भाषणात बायनू म्हणायचे. ते सांगायचे, बायनू, आयुष्यात एक गोष्ट लक्षात ठेवा, कोणावरही पूर्ण विश्वास ठेवावा, असं कोणीही नसतं. कोणीच व्यक्ती आपली पूर्णपणे नसते. जोपर्यंत आपले श्वास सुरू आहेत, तोपर्यंत आपण आयुष्याची मांडलेली गणिते कोणालाच सांगू नयेत, कारण नेहमीपेक्षा व्यवहारात गणिते मांडणा-यापेक्षा ते सोडवण्याची घाई आणि इच्छा करणा-यांची संख्या जास्त असते. आत्ता त्यांच्या विचारांचं आणि कृतीत आणण्याचं गणित माझ्या लक्षात आलं. आजपर्यंत त्याची पत्नी अगर मुलगा यांना काकांच्या ठेवी आहेत किंवा नाहीत, मृत्युपत्र केले आहे किंवा नाही, कोणाचे ते देणे आहेत का? कोणी त्यांचे देणे लागते का? अशा सर्व प्रश्नांच्या उत्तराची सुतराम कल्पना नव्हती. त्यांच्या वस्तूला कोणी हात लावलेला त्यांना अजिबात खपत नसे. त्यामुळे आत्ता त्यांच्या कपाटाला आणि त्यांच्या वस्तूला हात लावताना अगदी नकळत, समोर त्यांच्या फोटोला मनोमन नमस्कार करून आता आमचा नाईलाज आहे म्हणत कबुली आणि माफी मागितली गेली.

कपाट उघडलं तर पाहाताच कोणालाही लक्षात आलं असतं की, शिस्तीच्या वागणुकीचा तो एक आरसा होता. पद्धतशीर आणि नीटनेटकेपणाचा आविष्कार असाही जाणवतो. त्या कपाटातील इतर तपशील पाहण्यापेक्षा माझ्या मनाने वेध घेतला उजव्या कोप-यात असलेल्या मोठ्या डायरीने. काकांच्या हातात खूप वेळा मी ती पहिली होती. त्यांची रोज नोंद करण्याची सवयसुद्धा माहीत होती. डायरी म्हणजेच दैनंदिनी किंवा रोजनिशी हा संदर्भ निव्वळ त्यांनाच माहीत असावा. माझं लक्षं गेलं, उत्सुकतेने मनातल्या मनात हालचाल करायला सुरुवात केलीच होती. मी ओमकारला म्हटलं, आपल्याला शोधायचंय ते या डायरीत नोंद केलेलं असू शकतं. आपण पाहूया का ती? मी एकदा काकांना या त्यांच्या हातात असणा-या डायरीबद्दल छेडलं होतं, त्यावेळी ते म्हणाले होते, ही माझी सखी आहे. ती माझ्या शेवटच्या क्षणापर्यंत माझी साथ सोडणार नाही. मी ही तिला तोपर्यंत बाजूला करणार नाही. मी तिच्याशी आणि तीच माझ्याशी प्रामाणिक आहे. आज त्यांचे ते सर्व शब्द मला आठवले. शब्दांची हीच जादू असते. शब्द तेच असतात, पण स्थळ, काल, वेळ, व्यक्ती, भाव, लय या सर्वांच्या संदर्भाने त्याच्या आपण लावायच्या अर्थाला वेगवेगळ्या छटा निर्माण होतात. आजही ती डायरी हातात घेताना काकांविषयी व त्या डायरीविषयी दोघांबद्दल संमिश्र भावना मनात दाटून आल्या.

मी डायरी उघडण्यापूर्वी मनोमन काकांना नमस्कार केला. पहिलं पान उघडलं, त्या पानावर वरच्या बाजूला मध्यभागी अतिशय कोरीव अक्षरात ङ्गसखीफ असं लिहिलं होतं. जणू लाडीक सादच घातली आहे, असं वाटावं. त्यानंतर तशाच सुबक हस्ताक्षरात मनोगत लिहिलं होतं. सखी, तुझ्याजवळ माझा प्रत्येक दिवस असेल. मी तो तुझ्याकडे नोंद करेन. तुला कधीही अंतरणार नाही, जेव्हा २४ तासांपेक्षा जास्त कालावधी आपल्यात पडेल, तेव्हा तू समंजसपणे समजून जा की, मी तुला आणि या जगाला अंतरलो आहे. हा मथळा वाचून मी तेथेच थबकले. काय भावना असतील आता या सखीच्या? त्या लेखनावरून हात फिरवला जणू त्या सखीला सांत्वनाची फुंकर घालण्याचा तो एक माझ्याकडून झालेला प्रयत्न होता. पुढचं पान उघडलं आणि तशीच पाने पलटत वाचन केलं. ते लेखन हा एक माझ्यासाठी अशा परिस्थितीत का होईना, पण लेखन कसे असावे याचा आदर्श नमुना वाटला. खरंच ती अक्षरश: काकांची सखी होती, याची साक्ष ठायीठायी मला येत होती. सर्व नोंदी म्हणजे आजचा माझा दिवस कसा ही प्रांजळपणे दिलेली कबुली होती. काही वेळा त्रोटक नोंदी होत्या, पण जे होतं ते निखालस सत्य होतं. काही वेळा तर प्रत्यक्ष कोणाची सहज काकांकडून माफी मागितली गेली असेल का, मला शंका आहे, पण त्या त्या दिवशीच्या मनोगतात मनाशी झालेल्या संवादाने आपल्या सखीच्या कानात दिलेली साक्ष होती. मग लेकाबरोबर झालेला वाद असेल, बायको बरोबर झालेलं भांडण असेल, भावकीत झालेला विसंवाद असेल, निमित्त काही असलं आणि स्वत:चं काही चुकलं अशी भावना असेल तर तसं स्पष्ट लिहिलं होतं. हे सारं लेखन हा एका व्यक्तीचा जीवन व्यवहार होता.

माझ्या मनात घर करून राहिलं ते हे असं नातं. जे नातं जोडताना तयार होताना विचार, संकल्पना एका मनातून आलेली. निर्मिती स्वीकार एका व्यक्तीचा. पण, जेव्हा पूर्णविरामाची वेळ येते, ती मात्र विधात्याने आखलेली. नातं हे नेहमी दुहेरी असतं, असा समज, पण अशा नात्यात काय मानायचं? की, समोरच्याने निष्क्रिय असावं हीच त्या व्यक्तीची जोडीदाराकडून असणारी आंतरिक गरज, अपेक्षा? आणि त्या अपेक्षापूर्तीने घडणारं किंवा मानलेलं नातं हे चिरंतन राहातं? काय विचार करावा, अशा नात्याच्या संकल्पनेचा? आणि सखी तीच काय? कसं समजणार तिला तिचा निस्सीम जोडीदार तिला सोडून उर्ध्वगतीला निघून गेला? त्याने सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे २४ तासाचे गणित तिला कळले की.. इहलोकीचा प्रवास आपल्या माणसाचा संपला हे तिने समजून घेतले? का तेवढ्याच संवेदनशीलतेला कळले असेल की, मी एका परक्या व्यक्तीने तिला स्पर्शून अनुभवल्याने आपल्या नात्यातील गोपनीयता संपुष्टात आली? काय भावनांचं विश्व असेल तिचं?

# मुलांची झोप मोठ्यांसाठी प्रेरणा



दिवसभर काम, शारीरिक- मानसिक थकवा येऊनही कित्येकदा झोप व्यवस्थित येत नाही. सकाळी जाग आल्यानंतर चिडचिड होते. कारण संपूर्ण आठ तास झोपूनही ताजेतवाने वाटत नाही. झोपेबाबत या तक्रारी सामान्य झाल्या आहेत. यासाठी आता झोपेसाठी आपण लहान मुलांसाठी केल्या जाणाऱ्या तीन चरणांची छोटीशी प्रक्रिया अवलंबावी.

१. वेळ ठरवावी : लहान मुले त्यांची वेळ होताच झोपी जातात. भले त्यावेळी ते कोठेही असोत. उत्तम झोपेसाठी एक वेळ ठरविणे अत्यंत आवश्यक असते. जेव्हा आपण दहा दिवस रात्री ९.३० वाजता झोपण्याचा प्रयत्न कराल, तर अकराव्या दिवशी आपोआप याचवेळी झोप येऊ लागेल.ठरल्यावेळी झोपल्यामुळे झोप पूर्ण होईल आणि लहान मुलांप्रमाणेच सकाळी ठरल्यावेळी जाग येईल.

२. स्नान करा : मुलांना कोमट पाण्याने स्नान घालताच चटकन झोप येते. त्यांच्याप्रमाणेच आपणही रात्री झोपण्यापूर्वी एक तास कोमट पाण्यान स्नान करावे. असे केल्यामुळे झोपताना आपल्या शरीराचे तापमान सामान्य होईल. नंतवाहिन्या प्रसरण पावतील व नंतप्रवाह वाढेल. त्यामुळे आपण सुखद गाढ झोप घेऊ शकाल.

३. लोशनने मसाज करा : लहान मुलांना स्नान घातल्यानंतर जेव्हा त्यांची मालीश केली जाते, तेव्हा ती पटकन झोपतात. मुलांप्रमाणेच आपणही स्नान केल्यानंतर व झोपण्यापूर्वी शरीरावर बॉडीलोशन लावावे आणि हल्क्या हाताने साधा मसाज करावा. यामुळे शरीर आरामाच्या अवस्थत पूर्णपणे येईल व लवकरच आपल्याला झोप येईल.

हेही आजमावा या तीन टप्प्यांतून गेल्यानंतर आरामात बेडवर झोपा. एखादी चांगली गोष्ट वाचा वा शांतीदायक संगीत ऐका. ही प्रक्रिया करण्यापूर्वी मोबाइल एखाद्या कोपऱ्यात ठेवून द्या. लहान मुलांना जेव्हा आजी गोष्टी सांगते वा अंगाई गाते तेव्हा त्यांना गोड झोप येते. त्यामुळे गोष्ट व संगीताची ही युती स्वत:वर आजमावून पाहा.

# दोन दुचाकी एकमेकांवर धडकल्या, दोघांचा जागीच अंत,

## एक महिला जखमी, बारामतीत हळहळ

**बारामती:** संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर बारामती तालुक्यातील जराडवाडी येथे दोन दुचाकी एकमेकांना समोरासमोर धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, एक महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. यामध्ये शरद (नाना) दत्तात्रेय मोरे (वय ३६ रा. सोनवडी सुपे ता. बारामती) आणि ज्ञानेश्वर बबन वलेकर (वय ४२ रा. दहीगाव ता. माळशिरस जि. सोलापूर) अशी या अपघातात दुर्दैवी मृत पावलेल्या दुचाकीस्वारांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (२० जुलै) रोजी सायंकाळी चारच्या दरम्यान संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर जराडवाडी हद्दीत आठवा मैल जवळ अपघाताची घटना घडली आहे. यामध्ये हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर (दुचाकी क्र. - एम. एच. ४२ व्ही ३२१९) दुचाकी बारामतीच्या दिशेने निघाली होती. यावेळी समोरुन होंडा कंपनीची ॲक्टिव्हा (दुचाकी क्र - एम. एच १४ जे. जी. ९२०६ ) ही दुचाकी बारामतीकडून पाटसकडे निघाली होती. या दोन दुचाकी समोरासमोर एकमेकांवर जोरदार धडकून अपघात झाला



आहे. अपघातात अक्कामाई ज्ञानेश्वर वलेकर (वय ३९) या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारासाठी बारामतीत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.पंधरा दिवसांपूर्वी याच मार्गावर आणखी एक भीषण अपघात झाला होता. या अपघातातही दोघांचा मृत्यू झाला होता. टाटा टिगोर कंपनीची कार दौंडकडून बारामतीकडे निघाली होती. यादरम्यान कारचालकाचं कारवरील नियंत्रण सुटलं आणि कार राष्ट्रीय महामार्गावरील मोठा दुभाजक ओलांडून दुसऱ्या बाजूला गेली. त्यावेळी त्या रस्त्याने येणाऱ्या दुचाकीची या कारसोबत जोरदार धडक झाली आणि या अपघातात दोघांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की, वाहनचालकाचं शीर धडावेगळं झालं आणि कारचालकाचाही मृत्यू झाला

# आर जे महवशने युझीसाठी केली पोस्ट; लंडनमधला फोटो शेअर चहलला बनावट असं का म्हणाली?

**मुंबई:** मागील काही काळापासून अनेक क्रिकेटपटूंचे घटस्फोट होत आहे. या घटस्फोटांमुळे क्रिकेटपटू हे चर्चेचा विषय बनत आहे. काही तर घटस्फोटानंतर नवीन गर्लफ्रेंडमुळे चर्चेत आले. अश्यातच युझवेंद्र चहल त्याच्या नवीन गर्लफ्रेंडमुळे चर्चेत आला आहे. लंडनमधील युझी आणि महवशचा एक व्हिडिओ आतचा जोरदार व्हायरल होत आहे. क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि कंटेंट क्रिएटर आरजे महविश यांच्यातील अफेअरच्या अफवा पुन्हा एकदा तीव्र झाल्या आहेत. दोघेही लंडनमध्ये एकत्र दिसले होते, त्यानंतर त्यांच्या नात्याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. दोघांनी नेहमीच एकमेकांना फक्त मित्र असे म्हटले आहे. लंडनमध्ये फिरतानाचे फोटो शेअर केल्यानंतर आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्या अफेअरची चर्चा आणखी वाढली आहे. व्हिडिओमध्ये दोघे एकत्र फिरताना दिसत आहेत.चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्यात मतभेद झाल्याच्या बातम्या आल्यापासून युजवेंद्र चहल आणि आरजे महवश यांच्यातील अफेअरच्या अफवा तीव्र होत आहेत. मार्चमध्ये दोघांचा घटस्फोट झाला. तेव्हापासून, महवश आयपीएल २०२५ च्या सामन्यांमध्ये चहलच्या टीम पंजाब किंग्जचा जयजयकार करताना दिसली आहे. ती



केवळ स्टँडमध्येच नाही तर संघासोबतही वेळ घालवते.महविशने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये चहलसोबतचा एक मजेदार किस्साही शेअर केला. तिने लिहिले की, अखेर यूकेमध्ये मी बनावट ऐकसन्ट नसलेल्या भारतीयासोबत शूट केले. तिने असेही सांगितले की एका चाहत्याने चहलला त्याच्या स्किनकेअर रूटीनबद्दल विचारले, ज्यामुळे चहल लाजला. ङ्कङ्क महविशने टाकलेली ही पोस्ट काही तासांत व्हायरल होऊ लागली.चहलने द ग्रेट इंडियन कपिल शो मध्ये एक मजेदार टिप्पणी देखील केली होती. जेव्हा त्याला त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा तो हसला आणि म्हणाला की भारताला हे चार महिन्यांपूर्वीच माहित पडले आहे. चाहत्यांनी हे विधान आरजे महविशशी जोडले. आयपीएल २०२५ दरम्यान पंजाब किंग्जच्या सामन्यांमध्ये महविश सतत दिसली तेव्हा चर्चेला आणखी उधाण आले होते.

# वैनगंगा नदीच्या पुलावरून जाताना नियंत्रण सुटलं अन् दुचाकीसह दोघे कोसळले अन् मग...

**भंडारा:** वैनगंगा नदीच्या जुन्या पुलावरून जात असताना अचानक संतुलन बिघडल्याने दुचाकीसह दोन जण नदीत बुडाले. हे पाहताच नदीवर आंघोळीसाठी आलेल्या तैराकी मित्र मंडळाच्या सदस्यांनी क्षणाचाही विलंब न लावता बचावकार्य राबवून दोघांनाही नदीतून बाहेर काढलेगडेगाव लाखनी येथील सुकराम फसाटे व जितेंद्र सपाटे हे भंडारा जिल्हा दूध संघाचे कर्मचारी आहेत. हे दोघेही दुचाकीने भंडारा येथे कार्यालयात जाण्यासाठी दुचाकीने निघाले होते. वैनगंगेवरील जुन्या पुलावरून जात असताना अचानक त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दोघेही दुचाकीसह थेट नदीत



कोसळले. पुलावरून जाणाऱ्या लोकांनी आरडाओरड केल्यानंतर नदीवर आंघोळीसाठी गेलेले तैराकी मित्र मंडळाचे सदस्य यांनी धावत येऊन पुलावरून नदीत उडी घेतली. दोरखंडाच्या मदतीने पुलावरून त्यांना सुखरूप काठापर्यंत ओढत नेऊन दोघांचेही जीव वाचविले.वैनगंगेवरील जुना पूल धोकादायक झाल्याने या पुलावरून वाहतूक करू नये, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. तरीही हलके वाहनचालक, पायदळ जाणारे नागरिक याच पुलाचा वापर करतात. अलीकडेच आलेल्या पुरामध्ये हा पूल पूर्णपणे बुडाला होता. त्यामुळे हा पूल ठिकठिकाणाहून उखडला गेला आहे.

साधी दुचाकीसुद्धा चालविणे जीवावर बेतणारे आहे. तरीसुद्धा या पुलावरुन वाहतूक सुरूच आहे. याशिवाय, पुलावरील कठडे अनेक वर्षांपासून लावण्यात न आल्याने जिल्हा प्रशासनाच्या कारभारावरसुद्धा नाराजी व्यक्त होत आहे.भंडारा तालुक्यातील खमारी बुटी येथील रेतीचोरी रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसाच्या अंगावर ट्रॅक्टर चढवून चिरडण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही खळबळजनक घटना शनिवारी दुपारी साडेतीन वाजतादरम्यान घडली. या हल्ल्यात पोलिस कर्मचारी गायधने यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.शनिवारी दहा ते बारा पोलिस कर्मचारी रेतीचोरीवर कारवाईसाठी बेलगाव घाटात आले होते. त्यांनी चारही बाजूंनी वेढा घातल्यानंतर मोटघरे नामकच्या ट्रॅक्टरचालकाने घाबरून जाऊन थेट गायधने यांच्या अंगावर ट्रॅक्टर घातला. ट्रॅक्टरच्या धडकेत त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. कारवाईदरम्यान अनेक ट्रॅक्टर पकडण्यात आले.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राहुल गांधींना पंतप्रधान पदाची ऑफर होती, पप्पू यादव यांचा मोठा गौप्यस्फोट...

**पाटणा :** बिहारचे अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. दिवंगत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी राहुल गांधी यांना पंतप्रधान पदाची ऑफर दिली होती. पण राहुल गांधी यांनी ती नाकारली होता, असा मोठा गौप्यस्फोट पप्पू यादव यांनी केला आहे. राहुल गांधींना सत्तेची हाव नाही, ते जनतेची सेवा करतात, असेही ते म्हणाले आहेत. देशाला योग्य दिशेला न्यायचं असेल, तर राहुल गांधींसारख्या नेत्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केलं आहे. पप्पू यादव यांनी एएनआयला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी संबंधित दावा केला आहे.एएनआयच्या पॉडकास्टमध्ये बोलताना पप्पू यादव म्हणाले की, ङ्कङ्कराहुल गांधी यांनी पंतप्रधानपदाची ऑफर नाकारली. ही ऑफर खुद्द मनमोहन सिंह यांनी दिली होती. ङ्कङ्कराहुल गांधी पंतप्रधानपदाची खुर्ची एका क्षणात नाकारणारा, हार्वर्ड विद्यापीठात शिकलेला, सत्य बोलण्याची हिंमत असणारा हुशार मुलगा आहे. त्यांनी पंतप्रधानपदाची ऑफर नाकारली. मनमोहन सिंह म्हणाले की, राहुलजी तुम्ही पंतप्रधान बना, तेव्हा ते म्हणाले, कधीच नाही. १० हजार किलोमीटर पायी चालणारा माणूस, सत्याची हिंमत बाळगणारा, जो पंतप्रधानपदाची खुर्ची सोडून देतो, त्यालाही कोणी पप्पू म्हणतं का?ङ्कङ्क असा सवाल त्यांनी केला. याच मुलाखतीत पप्पू यादव म्हणाले की, ते काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या प्रेमात वेडे झाले आहेत.पप्पू यादव यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधानपदाची ऑफर का नाकारली, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत. काही लोक म्हणतात की, राहुल गांधींना सत्तेची हाव नाही. तर काही लोक म्हणतात की, त्यांना जबाबदारी घ्यायची नव्हती. या विधानामुळे काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्या प्रतिमेवर काय परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे आहे.पप्पू यादव यांच्या दाव्यावर काँग्रेसच्या नेत्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, विरोधकांनी यावरून राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की, राहुल गांधींना देशाची जबाबदारी घ्यायची नाही. त्यामुळे त्यांनी पंतप्रधानपदाची ऑफर नाकारली. आता या प्रकरणावर राहुल गांधी काही प्रतिक्रिया देतात का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.मनमोहन सिंह २००४ ते २०१४ पर्यंत देशाचे पंतप्रधान होते. ते एक कुशल अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. १९९१-९६ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये ते अर्थमंत्री होते. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे बदल केले. २६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांचे ९२ व्या वर्षी निधन झाले.मनमोहन सिंह कमी बोलत असत आणि विचारपूर्वक बोलत असत. त्यांना हृदयविकाराचा त्रास होता. त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या दिवसांमध्ये त्यांची तब्येत ठीक नसल्यामुळे प्रशासनावर त्यांची पकड कमी झाली होती. त्यामुळे -२ च्या काळात भ्रष्टाचाराचे आरोप झाले. काँग्रेस पक्ष आणि सरकार या आरोपांचे योग्य प्रकारे खंडन करू शकले नाहीत. त्यावेळी राहुल गांधी राजकारणातील गोष्टी शिकत होते.



गांधी घराण्यात पंतप्रधान होण्यासाठी राजकीय तज्ज्ञ असणे आवश्यक नाही. त्यासाठी फक्त संसदेत बहुमत असणे आवश्यक आहे, जे मनमोहन सिंह सरकारकडे होते. राहुल गांधींनी ठरवले असते, तर ते मनमोहन सिंह यांच्या कार्यकाळात पंतप्रधान बनू शकले असते. पण याबद्दल काँग्रेसने किंवा गांधी घराण्याने कधीही काही सांगितलं नाही. आता पप्पू यादव यांनी हे विधान केले आहे. पप्पू यादव यांचा संसदीय कार्यकाळ खूप मोठा आहे. त्यांना सत्तेच्या गणिताचा अनुभव आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यावर काँग्रेसकडून काही प्रतिक्रिया देण्यात येते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# आईवर झालेल्या अन्यायाचा बदला घेणार तारिणी

## काय आहे नव्या मालिकेचे कथानक? लोकप्रिय अभिनेत्रीने केलीये निर्मिती

**मुंबई:** झी मराठीवर लवकरच तारिणी नावाची एक नवीन मालिका सुरू होणार आहे. ही मालिका एका तरुणीच्या संघर्षाची कहाणी आहे. तारिणी बेलसरे नावाची ही मुलगी मुंबईत राहते. तिच्या आईवर खोटे आरोप लागतात आणि त्यामुळे तिची आई आत्महत्या करते. तारिणीला तिच्या आईला न्याय मिळवून द्यायचा आहे. यासाठी ती पोलिसात भरती होते, अशी तारिणीची कहाणी आहे.दरम्यान तारिणी बेलसरेबद्दल अधिक सांगायचे झाल्यास, तिची आई पोलिस खात्यात हेड कॉन्स्टेबल होती. ती खूप प्रामाणिक होती, पण तिच्यावर लाच घेतल्याचा आरोप होतो. या आरोपांमुळे ती आत्महत्या करते, असे दाखवले जाते. तारिणीचे वडील तिच्या भविष्याचा विचार करून दुसरे लग्न करतात. तारिणीची सावत्र आई घरात आल्यावर तारिणीच्या पहिल्या आईचा उल्लेखही नको, असे जाहीर करते. तारिणीला खात्री आहे की तिची आई कधीच चुकीचे वागू शकत नाही. त्यामुळे ती आपल्या आईचे सत्य जगासमोर आणण्यासाठी पोलिसात भरती होते. तिला तिच्या आईच्या गुन्हेगाराला शोधायचे आहे. या प्रवासात तिला केदार नावाचा एक मुलगा भेटतो. केदारही तिच्यासह पोलिसात असून, त्याचा निशाणा कधीच चुकत नाही. केदारचीही एक वेगळी कहाणी आहे. त्याच्या वडिलांनी त्याला लहानपणीच सोडलेले असते, तो त्यांचा शोध घेतो आहे. तारिणी आणि केदार दोघेही एकमेकांना आधार देतात. तसेच केदारच्या मनात तारिणीबद्दल प्रेम आहे, पण तो हे तिला तिला ते सांगू शकत नाही.याशिवाय या मालिकेत एक ट्विस्ट आहे. तारिणी आणि केदार मीडिया टायकून असणाऱ्या खांडेकरांच्या घरात राहायला जातात. त्यांना खांडेकरांच्या घरात का जावे लागते? खांडेकरांच्या घरात शिरून ते काय शोधणार आहे? खांडेकरांच्या घरात तिला तिच्या आईच्या गुन्हेगाराचे धागेदोरे सापडणार का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मालिकेत मिळतील. तसेच यामुळे तारिणी आणि केदारच्या नात्यात दुरावा येणार का, हेही पाहणे महत्त्वाचे ठरेल. या मालिकेची कथा आणि पटकथा प्रल्हाद कुडतरकर यांनी लिहिली आहे. पूर्णानंद वांढेकर हे संवाद



लेखक असून भीमराव मोरे यांनी दिग्दर्शन केले आहे. एरिकॉन टेलिफिल्म्सच्या शर्मिष्ठा राऊत आणि तेजस देसाई या मालिकेचे निर्माते आहेत. झी मराठीवर येत्या ११ ऑगस्टपासून काही नवीन मालिका सुरू होणार आहे. तेजश्री प्रधान-सुबोध भावेच्या वीण दोघांतली ही तुटेना या मालिकेसह शिवानी सोनार आणि स्वराज नागरगोजे यांची ही तारिणी मालिकाही सुरू होते. सोम ते शुक्र रात्री ९.३० वाजता ही मालिका प्रसारित होणार आहे.

# भारतीय संस्कृती टिकविण्यात महिलांचे योगदान मोठे- राधेश्याम चांडक

**जनसंचलन/बुलडाणा**

श्रावण महिना हा हिंदू वर्षातील एक पवित्र महीना मानल्या जातो. भगवान शंकराचा अत्यंत प्रिय असलेला हा महिना आहे आणि या महिन्यात शंकराची पुजा अर्चा, उपवास, अभिषेक, इत्यादी धार्मिक विधी केले जातात. हे सर्व धार्मिक विधी पार पाडता यावे म्हणुन सद्भावना सेवा समितीने बालसंत श्री दिपशरणजी महाराज, चित्रकुट, यांची श्री शिवमहापुराण कथा दि.०४ ऑगष्ट ते १० ऑगष्ट पर्यंत वारकरी भवन, सर्क्युलर रोड, बुलडाणा येथे आयोजित केली आहे. या संदर्भात नुकतीच जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज वारकरी भवन येथे महिलांची सभा घेण्यात आली. सर्व समाजाच्या महिला मंडळांनी भाग घेवून चर्चा केली. कथेच्या सातही दिवसाची जबाबदारी महिलांनी स्विकारली. हा उत्साह पाहुन भारतीय संस्कृत टिकविण्यात महिलांचे योगदान मोठे आहे असे प्रशंसनीय उद्गार सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष श्री. राधेश्याम चांडक यांनी काढले.

कथेमध्ये सर्व व्यवस्था चोख ठेवावी व ही कथा आनंदोत्सव करावा अश्या सुचना यावेळी केल्या. महिलांच्या सभेत चंपालाल शर्मा, प्रकाशचंद्र पाठक यांनी मार्गदर्शन केले. लाला माधवणी यांनी आभार प्रदर्शन केले. दि. ०४ ऑगष्ट सोमवार दुपारी १.०० वाजता श्री संत गजानन महाराज मंदिरापासुन ५१ कलशधारी महिला, भजनी दिंड्या, अश्वारुढ रथ यासह शोभायात्रा निघुन वारकरी भवनपर्यत जाईल व कथेला सुरुवात होईल. प्रथम दिवस परशुराम ब्राम्हण समाज महिला मंडळाने घेतला असुन शिवमहापुराण कथेचे महात्म्य संदर्भात झाँकी प्रस्तुती, समुहनृत्य, प्रसाद वितरण व अभिषेकाची तयारी, आरतीची तयारी या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतील. दुसऱ्या दिवशी जैस्वाल समाज महिला मंडळ, तिसरा दिवस जांगीड समाज महिला मंडळ, चौथा दिवस लेवापाटील समाज सखी मंच व गुरव समाज महिला मंडळ, पाचवा दिवस सिंधी समाज, पंजाबी समाज, वर्मा व गुजराथी समाज महिला मंडळ, सहावा दिवस माहेश्वरी समाज महिला मंडळ, सातवा दिवस अग्रवाल समाज महिला मंडळाकडे आहे. या सर्व मंडळाना कुमावत समाज, राजपूत समाज, परदेशी उत्तर भारतीय समाज, माळी समाज, गायत्री परिवार, मराठा समाज महिला मंडळ, इत्यादी महिला मंडळे सहकार्य करतील. या कथे दरम्यान बारा ज्योतीलिंगाची स्थापन केली असुन सर्वांना अभिषेकाचा लाभ घेता यावा म्हणुन रु.१,१००/- सह्योग राशी राहील. पुजेचे सर्व साहित्य समिती उपलब्ध करुन देईल. चित्रकुटचे आचार्य रुद्राभिषेक करवुन घेतील.

महिलांमध्ये सौ.अंजली पराजंपे, सौ.. माधुरी घोरपडे, सौ. शुभांगी



चंदन, सौ. निलम बाहेती, भारती झंवर, सौ.. मुक्ता पाटील, सौ. शीतल सोनुने, सौ. रोहिणी काटकर, सौ. कुंदा पाटील, सौ. सुनंदा कावळे, सौ. कल्पना किनगे, सौ. संध्या मिश्रा,सौ.सरोज चांडक, श्रीमती सावित्रीबाई काळे, सौ. आरती, सौ. रूपा, सौ. हंसा, सौ. माया, सौ. मनीषा, सौ. रेखा, सौ. बाली, सौ. जमुना शर्मा,सौ.मोनिका, सौ. सुनंदा, सौ. पौर्णिमा, सौ. पौर्णिमा, सौ.सुवर्णाज्योती जैस्वाल, सौ.रत्ना जैस्वाल, यांनी या चर्चेत सहभाग घेऊन सुचना केल्या, सद्भावना सेवा समितीने आयोजित केलेल्या शिवमहापुरान कथेचा श्रावण महिन्यात सर्वांनी लाभ घेवून पुण्य प्राप्त करावे आणि परमानंद प्राप्त करावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी यावेळी केले. कथा यशस्वी करण्यासाठी समितीचे सर्व पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्ते आणि विविध महिला मंडळाचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# बुद्ध विहाराकडे जाणारा रस्ता तात्काळ तयार करा- भाई विजयकांत गवई



**जनसंचलन/ चिखली**

चिखली गजानन नगर मध्ये बुद्धविहाराकडे जाणारा रस्ता डॉ. खेडेकर दवाखाना ते काकडे यांच्या घरापर्यंत रस्ता नाली बांधकाम करण्यात यावे या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने दि. २१ जुलै रोजी मुख्यअधिकारी यांना निवेदन देण्यात आले. बुद्धविहाराकडे जाणारा रस्ता कित्येक वर्षापासून बंद पडला आहे तिथे खड्डा करून रस्ता बंद करण्यात आला डॉ.खेडेकर दवाखाना ते काकडे यांच्या घरापर्यंत रस्ता नाली बांधकाम मंजूर होऊन तरीसुद्धा रस्ता नाली तयार करण्यात विलंब होत आहे नगरपालिका चिखली दुर्लक्ष का करताना दिसत आहे चिखली शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात रस्ते तयार करण्यात आले आहेत नागरिकांना बुद्ध विहाराकडे जाणारा रस्ता बंद का ठेवण्यात आला रस्ता मंजूर असताना देखील नगरपालिका काम करत नाही नागरिकांचा रस्ता बंद करून तिथे खड्डा खोदला शाळेतील मुले आणि नागरिकांना फिरून जावे लागतात बुद्ध विहाराकडे आणि नागरिकांचा रस्ता बांधण्यास अडथळा करत असले तर योग्य ती कारवाई करण्यात यावी बुद्ध विहाराकडे जाण्यासाठी रस्ता नाली तात्काळ तयार करण्यात यावे अन्यथा आगळे वेगळे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा रिपब्लिकन सेनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष भाई विजयकांत गवई यांनी निवेदनामध्ये दिला. निवेदन देतेवेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष ब्रम्हा साळवे, जिल्हा कामगार अध्यक्ष सुरेश इंगळे, शाखा अध्यक्ष सौरभ बावस्कर, शहर सदस्य स्वराज सागर उपस्थित होते.

# मन नदीच्या पुलावरून पाणी शेगाव आकोट राज्य महामार्ग वाहतुकीसाठी बंद

**जनसंचलन/ शेगाव**



बुलढाणा जिल्हा आणि अकोला जिल्ह्याला जोडणारा शेगाव जवळील मन नदीवरील पुलावरून आज सकाळी नऊ वाजेपासून पाणी वाहत असल्याने शेगाव आकोट हा राज्य महामार्ग वाहतुकीसाठी बंद झालेला आहे. मागील आठ दिवसांपासून परिसरामध्ये पावसाने दडी मारली होती दरम्यान आज सकाळपासून या भागामध्ये पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नदी नाले एक झाले आहे. शिवाय मन नदीवर पूर आल्याने अनेक पुलावरून पाणी जात आहे. शेगाव लोहारा दरम्यान असलेल्या पुलावरून पाणी जात असल्याने दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झालेली आहे

# हुमणी आळीग्रस्त शेतकऱ्यांसाठी तहसील कार्यालयात निवेदन सादर; पंचनाम्याची मागणी जोरदार

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा, शिवनी आरमाळ, पिंपरी आंधळे, मेंडगाव, बायगाव व परिसरातील शेतकऱ्यांनी हुमणी आळीच्या प्रचंड प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात मदतीची मागणी करत आज दिनांक २१ जुलै रोजी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ मॅडम .व नायब तहसीलदार सायली जाधव.व तालुका कृषी अधिकारी कचवे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या सौ. भारती अमोल इंगळे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांची नावे, सह्या व गट क्रमांक गोळा करून सविस्तर निवेदन तयार करण्यात आले. कापूस, सोयाबीन, तूर यासारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

१. हुमणी आळीग्रस्त गावांमध्ये कृषी विभागाने तात्काळ पाहणी करावी.


२. पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जावी.

३. हुमणी किडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित राबवाव्यात.

शेतकऱ्यांच्या वतीने पत्रकार नंदकिशोर देशमुख (दैनिक (महाभूमी) व पत्रकार हनीफ शेख (पुण्यनगरी) यांनीही जनजागृती व नोंदणीसाठी मोठा पुढाकार घेतला होता. अनेक शेतकऱ्यांनी घरपोच किंवा शेतातच भेट देऊन आपली नावे व सह्या नोंदवल्या. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांतून व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी निवेदन देताना . रामदास डोईफोडे काँग्रेस तालुका अध्यक्ष.




देऊळगाव राजा. केशव सानप तालुका काँग्रेस उपाध्यक्ष भास्कर वाघ. माजी तंटामुक्ती अध्यक्ष अंढेरा तसेच मेंडगाव येथील सिताराम राघोजी घुगे. शब्बीर खान पठाण. बबन पालवे . भास्कर वाघ व गजानन ढाकणे. विकास कायंदे लखन जोहरे. दिनकर देशमुख. अशोक काळुसे. भास्कर गीते. संतोष पालवे. जीवन कणखर.व अंढेरा सर्कलमध्ये बरेचसे शेतकरी हजर होते.



# रमी खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांचा राजीनामा मागावा ते चार मंत्री घरी जातील-क्रांतीक्रारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर

जनसंचलन/बुलडाणा

अत्यल्प पावसामुळे राज्यात खरीप हंगाम हातातून निसटून जाण्याची वेळ आली असताना कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हातात मोबाईल घेऊन जंगली रमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.या प्रकरणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तूपकर यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. खरीप हंगाम हाताबाहेर जाण्याची शक्यता बळावत चालली आहे.कर्जबाजारीपणा व शेतकरी आत्महत्या दिवसागणिक वाढत आहे.अशा परिस्थितीत संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांनी पेरणी केली.मात्र बोगस बियाणांमुळे शेकडो शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली.त्यातच अंकुरलेल्या पिकावर हुमणी अळीने घाला घातला,एकीकडे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाला भाव नाही. शासनाच्या उदासीन धोरणामुळे नैराश्याच्या गर्तेत शेतकरी मृत्यूला जवळ करत आहेत, असे तूपकर प्रतिक्रिया देताना म्हणाले. लोकशाहीचे पवित्र मंदिर समजल्या जाणाऱ्या विधानसभेत शेतकऱ्यांचे किंवा सर्वसामान्यांचे प्रश्न न मांडता, त्यांच्यासाठी न्यायाची भूमिका न घेत असल्याचे दुर्दैवी चित्र दिसत आहे.विधानसभेच्या सभागृहात शेतकऱ्यांसाठी, सर्वसामान्यांच्या न्यायार्थ चर्चा झाली पाहिजे. त्यांचे प्रश्न सोडविले पाहिजे. सभागृहात मिनिट टू मिनिट कामांची नोंद घेतली जाते. याचे रेकॉर्ड असते.सेकंद न् सेकंद जातीच्या कामकाजासाठी वापरला गेला पाहिजे.मात्र राज्याची कृषिमंत्री मोबाईलवर जंगली रमी खेळत असतील तर ही दुर्दैवाची बाब आहे.ते म्हणतात की मी खेळलो नाही,मात्र त्यांनी तेथे मोबाईल हाताळण्याची गरज काय?त्यांच्यावर कृषी खात्याची जबाबदारी नाही तर इतरही कामकाजांची जबाबदारी आहे परंतु ते वारंवार शेतकऱ्यांना अपमानित करतात,शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात,त्यामुळे त्यांनी आता गांभीर्यपूर्वक व जबाबदारीने वागणे गरजेचे आहे.मुख्यमंत्र्यांनी त्यांना समज देऊन त्यांचा राजीनामा मागितला पाहिजे अशी मागणी रविकांत तुपकर यांनी केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक ट्विट केलं आहे. या ट्विटमुळे राजकीय



वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. चार मंत्री नक्की घरी जाणार, महाराष्ट्रात वेगवान घडामोडी लवकरच सुरू होतील! असा दावा राऊत यांनी केला आहे.यावर रविकांत तुपकर म्हणाले की,जे वादग्रस्त मंत्री आहेत. ज्यांच्यामुळे सरकार अडचणीत येते, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.संजय राऊत यांना आतली माहिती असू शकते ते दिल्लीला सातत्याने राहतात.कारवाई होईल की नाही हे माहीत नाही पण जबाबदार पदावर बसून स्वैराचार करण्याचा अधिकार त्यांना नाही.कारण त्यांचा प्रवास सामान्यांकडून असामान्य कडे जाणारा आहे. वागणं- बोलणं सौजन्यशील असावं,गल्ली छापवत चिल्लर वागत असाल तर याचा परिणाम महाराष्ट्रावर होतो.परिणामी महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होत असल्याने अशा मंत्र्यांवर कारवाई झाली पाहिजे.

---

# हुमणी अळीने कुरतडले हिरवे स्वप्न!

## जिल्हाधिकाऱ्यांनी काढले पंचनामा करण्याचे आदेशपत्र!

जनसंचलन/बुलढाणा

हुमणी अळीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न कुरतडून कहर केला, शेकडो हेक्टर पिक फस्त केल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. परंतू आज जिल्हाधिकारी यांनी पंचनामा करण्याचे आदेशपत्र काढले असून कार्यवाही संथ असल्याचे दिसून येते आहे. शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरणाऱ्या हुमणी अळीचा प्रादुर्भाव खरीप हंगामातील अनेक पिकांवर दिसून येतो. सोयाबीन, कापूस, तूर, हळद, ज्वारी, मका आणि ऊस या पिकांवर याचा परिणाम अधिक जाणवतो. ही अळी जमिनीत राहून पिकांच्या मुळांना हानी पोहोचवते, त्यामुळे उत्पादनात मोठी घट होते. या किडीमुळे शेतकऱ्यांचे सध्या स्थितीत ३० ते ८० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ लागले आहे. दरम्यान कृषी विभागाकडून या संदर्भात जनजागृती सुरू आहे परंतु एकात्मिक कीड योजना हुमणी अळीला आटोक्यात आणू शकते. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी हुमणी अळीने पिकांवर हल्लाबोल चढवल्याने शेतात रोटाव्हेटर फिरवला असून,त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आता होत आहे. हुमनी अळीचा सोयाबीन पिकांवर दुष्परिणाम दिसून येत आहे. माझ्या गट क्रमांक ४४ व ४७ या शेत जमिनीवरील सोयाबीन पिकांवर हुमणी अळीने हल्ला चढवला असून,तलाठी जय शिरसाठ व कृषी सहाय्यक सुषमा डुकरे यांनी माझ्यावर देविदास कंकाळ,विलास लहाने, सखाराम कंकाळ, पंढरी वैराग सतीश कंकाळ यांच्या शेतात देखील पाहाणी केली आहे.

-प्रकाश श्रीराम गारोळे शेतकरी नायगाव खु. हिवराआश्रम

या किडीचा प्रौढ भुंगा मजबूत बांध्याचा लालसर तपकिरी रंगाचा असतो. अळी पांढरी असून तिचे डोके गडद तपकिरी रंगाचे असते. तिला तीन पायाच्या जोड्या असतात. शेतात



नांगरणी करताना किंवा शेणखताच्या खड्ड्यात हमखास दिसणारी इंग्रजी सी अळी म्हणजे हुमणी होय. प्रौढ भुंगा बाभूळ कडूलिंब बोर इत्यादी झाडावर उपजीविका करतात हुमणी अळी पिकांची मुळे कुरतडून खाते. त्यामुळे झाड सुरुवातीला पिवळे पडते आणि नंतर वाळून जाते प्रादुर्भावग्रस्त झाडे सहज उपटली जाऊ शकतात. प्रामुख्याने खरीप हंगामात सोयाबीन,कापूस, जवारी,भात, ऊस, भुईमूग, भाजीपाला पिके, हळद, टोमॅटो, गहू, हरभरा या पिकांवर हूमणी अळी आढळून येते.

# रुसलेल्या पावसाने उल्कानगरीत घातले थैमान..!

जनसंचलन/ लोणार

लहरी पाऊस गेल्या दहा-बारा दिवसापासून रूसलेला होता परंतु काल रात्रीपासून पहाटेपर्यंत तो वक्रदृष्टीने असा बरसला की, त्याने पुन्हा शेतकऱ्यांसह अनेकांना संकटात आणले.पावसाने अनेकांच्या घरात शिरकाव केल्याने त्यांचा संसार उघड्यावर पडला असून,शेकडो हेक्टरवरील शेत जमीन खरडून गेली तर पेरणी उखडल्याने दुबार, तिबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. बुलढाणासह जिल्ह्यात काल रात्रभर पावसाने लोणार,मेहकर, खामगाव,शेगाव, सिंखेडराजा, चिखली या तालुक्यांना चांगलेच धुतले आहे. लोणार तालुक्यातील धरणे,नदी नाल्यांना पूर आला असून, हाहाकार उडाला आहे.रात्रभर झालेल्या मुसळधार पावसाने लोणार तालुका जलमय झाला.विजांचा गडगडाट उरात धडकी भरवणारा होता.नवीन आल्यांच्या पुलावरून व नदी शेजारील सर्व शेती पाण्याखाली गेल्याने प्रचंड नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. शहरातील बऱ्याच कॉलनीमधील घरांमध्ये पाण्याचा शिरकाव झाल्याने त्यांचा संसार उघड्यावर आला आहे.येथील महावितरण कार्यालयातही पाण्याने शिरकाव केला.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८